# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**दोडामार्ग ते तिलारी (ता.दोडामार्ग जि.सिंधुदूर्ग) या रस्त्याच्या दुरावस्थेबाबत**

**(१) ५७१३ (१०-०४-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग ते तिलारी (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदूर्ग) या रस्त्याच्या कामात काही ठिकाणी खडीकरण केले असता खडीकरणावर डांबर न घातल्याने सदर रस्त्यावरील खडीकरण उखडलेल्या स्थितीत दिसत असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रस्त्याच्या डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथील नवीन औद्योगिक वसाहतींच्या भुसंपादनाची प्रक्रिया पुर्ण झाल्याबाबत**

**(२) ५९७५ (१०-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथील नवीन औद्योगिक वसाहतींच्या भुसंपादनाची प्रक्रिया पुर्ण झाल्यामुळे या ठिकाणी उद्योगधद्याकरिता पाणी, रस्ते आणि विद्युत पुरवठा इत्यादी

पायाभूत सोईसुविधांसह भुखंड विकसित करण्याकरिता माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयाने व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विंचुर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील एमआयडीसी ही वाईन उद्योगासाठी राखीव असल्याने येथे वाईन उद्योगाबरोबरच इतर कृषी पुरक व अन्य प्रक्रीयासाठी उद्योगधंद्यांना परवानगी मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनस्तरावर बैठक घेण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ व दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) व (३) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

तथापि, संपादित क्षेत्राचे सर्व्हे व डिमार्केशनचे काम पूर्ण झालेले आहे. संपादित औद्योगिक क्षेत्राच्या आराखड्यास मंजूरी देणे, पायाभूत सोयी सुविधा यांना प्रशासकीय मान्यता देणे याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विचाराधीन आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) येवला, जि.नाशिक येथील संपादित क्षेत्राच्या आराखड्यास मंजूरी व पायाभूत सोयी सुविधा यास प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर पायाभूत सोयी सुविधांची कामे महामंडळामार्फत हाती घेण्यात येतील. तसेच विंचूर येथील टप्पा क्र. ३ मध्ये ४० हेक्टर क्षेत्र कृषी पुरक व अन्न प्रक्रिया उद्योगांना देण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कार्यवाही करीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मोहोळ ते पंढरपूर (ता.मोहोळ, जि.सोलापूर) या रस्त्याच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३) ६०६८ (१०-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ ते पंढरपूर (ता.मोहोळ, जि. सोलापूर) या रस्त्याच्या कामांच्या दुरूस्तीच्या कंत्राटदारांकडून ४३ लाख रूपयांची कामे करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून कंत्राटदारांनी सुमारे ३५ ते ४० लक्ष रूपयांचा अपहार केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०६-२०१५) :**(१), (२), (३) व (४) प्रश्नाधीन मोहोळ ते पंढरपूर रस्ता हा राज्य मार्ग क्र.१४१ चा भाग आहे. सदर रस्ता खाजगीकरणातून करण्यात आला होता, परंतु जुलै, २०१४ मध्ये रस्ता उद्योजकाकडून काढून घेण्यात आला आहे. रस्त्याची एकूण लांबी ३६.५० कि.मी. असून त्यापैकी १९.४०० कि.मी. लांबी मोहोळ तालुक्यातील आहे. सदर लांबीमध्ये रु.२३ लक्ष रुपयांची किरकोळ दुरुस्तीची कामे मंजूर आहेत. सद्यस्थितीत रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम पूर्ण झाले असून सिलकोटचे काम प्रगतीत आहे. पूर्ण झालेले काम विहीत मानकानुसार केलेले असून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

---

**रायगड जिल्हयातील औद्योगिक क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांना भूखंड देणेबाबत**

**(४) ६०९२ (०९-०४-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील महाड, अतिरिक्त महाड आणि विळे भागाड या औद्योगिक क्षेत्रातील ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत अशा प्रकल्पग्रस्त शेतक-यांपैकी काही प्रकल्पग्रस्तांना मोबदल्यासाठी भूखंड देण्याचा निर्णय महामंडळाने घेऊन अद्याप भूखंड देण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच कराराप्रमाणे सदर प्रकल्पग्रस्तांना भूखंड देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०८-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

ज्या प्रकल्पग्रस्त शेतक-यांनी भूखंडांची मागणी केलेली आहे, त्यांना भूखंडांचे वाटप करण्यात आलेले आहे.
(३) व (४) ज्या प्रकल्पग्रस्त शेतकल्यांनी भूखंडांची मागणी केलेली नाही, त्यांनी दि. ३१/०५/२०१५ पर्यंत पी.ए.पी. भूखंड मागणी अर्ज सादर करावेत, अशी जाहीरात

वर्तमानपत्रत जानेवारी, २०१५ मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. त्यास अनुसरुन विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील ६ प्रकल्पग्रस्त शेतक-यांकडून पी.ए.पी. भूखंड मागणी अर्ज प्राप्त झालेले असून त्यांना भूखंड वाटप करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

---

**सरवडे तालुक्यातील (जि.कोल्हापूर) बिद्री गावच्या नवीन पुलाला संरक्षक कठडे बांधण्याबाबत**

**(५) ६३८१ (०९-०४-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरवडे तालुक्यातील (जि. कोल्हापूर) बिद्री गावच्या ओढयावरील ३ वर्षांपूर्वी बांधलेल्या नवीन पुलाला दोन्ही बाजूला संरक्षक कठडे नसल्यामुळे तेथे अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन पुलाला संरक्षक कठडे न बांधण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर ठिकाणी होत असलेले अपघात थांबविण्यासाठी संरक्षक कठडे त्वरित बांधण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन पुल हा कोल्हापूर जिल्हयातील कागल तालुक्यातील प्रजिमा क्र. ४३ वर बिद्री गावातून जाणा-या ओढ्यावर आहे. सदर पुलाचे व संरक्षक कठड्यांचे बांधकाम सन २०११-१२ मध्ये पुर्ण झाले असून सद्यस्थितीत पूल वाहतूकीस सुस्थितीत आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एम.आय.डी.सी) जमिनी अतिक्रमणमुक्त करणेबाबत**

**(६) ६९२० (१०-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ठाणे व नवी मुंबई येथील जमिनीवरील अतिक्रमणे हटवून त्या जमिनी अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय उद्योग विभागाने नुकताच घेतला आहे, हे खरे आह काय,

(२) असल्यास, या जमिनीवर झोपडपट्टीधारक अनेक वर्षापासून वास्तव्य करीत असल्याने झोपडपट्टी धारकांच्या पुनर्वसनाबाबत काय उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्यापि, उपाययोजना करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०८-२०१५)** :(१) व (२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि.३०/०७/२०१२ रोजी झालेल्या बैठकीत टि.टि.सी. व वागळे इस्टेट या औद्यागिक क्षेत्राकरिता महामंडळामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. टि.टि.सी. औद्योगिक क्षेत्रातील २९ झोपडपट्ट्यांपैकी २ झोपडपट्ट्यांतील पात्र झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी महामंडळाने नवी मुंबई महानगरपालिकेस जागा उपलब्ध करुन दिली आहे. तर २७ ठिकाणच्या झोपडपट्टयांचे सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे. वागळे इस्टेट येथील झोपड्यांचे पुनर्वसन योजना राबविण्यासाठी पात्र झोपडपट्टी धारकांची संख्या निश्चित करणे, सर्वेक्षण करणे इत्यादी कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) झोपडपट्यांच्या सर्वेक्षणाचे काम सुरु असताना स्थानिक नागरिकांच्या तीव्र विरोधामुळे वांरवार अडथळे निर्माण होत असल्याने कामास विलंब झाला आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयातील उद्योजकांना जागा, वीजदरवाढ, पायाभूत सुविधा आणि परवान्याबाबत अडचणी असल्याबाबत**

**(७) ७११८ (१०-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील उद्योजकांनी वाढते वीज दर, जागेची टंचाई, विविध करांचा बोजा आणि अशा विविध कारणांनी उद्योग त्रस्त असल्याबाबतची तक्रार मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, उद्योजकांना जागा, वीजदरवाढ, पायाभूत सुविधा आणि परवान्यासंदर्भातील अडचणी असल्याने या संदर्भात दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत या समस्यांवर स्थानिक लोकप्रतिनिधींनी चर्चा केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१०-०६-२०१५)** :(१) होय.
(२) होय, सदरची बाब खरी आहे.
(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कळविल्यानुसार महाराष्ट्रात वीज अखंड व पुरेशा दाबाने खात्रीशीररित्या उपलब्ध होते.

उद्योगांसाठी आवश्यक परवानग्या कमी करण्यात येऊन म.औ.वि.मंडळातर्गत देण्यात येणा-या परवानग्यांचे सुसूत्रीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार एकाच अर्जामधून नकाशे मंजूरी, नळ जोडणी, जल निस्सा:रण, अग्निशमन दाखला, सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र, मेंबर शीप दाखला देण्यात येणार आहे. वीज जोडणीचा ना हरकत दाखला भूखंड वाटप पत्रासोबतच देयात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील बरेच अधिकारी व कर्मचारी अपडाऊन करीत असल्यामुळे कार्यालयात गैरहजर राहत असल्याबाबत**

**(८) ७८४९ (१०-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील बरेच अधिकारी व कर्मचारी अपडाऊन करीत असल्यामुळे कार्यालयात गैरहजर राहत असून कार्यालयाचा कारभार कर्मचारीकरीत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जालना येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी गैरहजर राहत असल्यामुळे कार्यालय एक व दोन मधील कार्यकारी अभियंत्याचे दालन नेहमीच बंद असते,हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गैरकारभाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार जालना येथील सार्वजनिक बांधकाम विभागाती अधिकारी गैरहजर अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) परळ, पनवेल, नेरळ-मंचर भिमाशंकर ह्या रस्त्याचे काम वनजमिनीच्या अडथळ्यामुळे पूर्ण होवू शकले नसल्याबाबत**

**(९) ८०४४ (१०-०४-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) परळ, पनवेल, नेरळ-मंचर, भिमाशंकर ह्या रस्त्याचे काम वनजमिनीच्या अडथळ्यामुळे पूर्ण होवू शकले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामासाठी असलेले अडथळे दूर करुन सदर रस्ते वाहतूकीसाठी सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०५-२०१५) :** (१) होय.
(२) प्रश्नांकित रस्त्यासाठी वन जमिनीतून जाणाऱ्या ४.४५१ कि.मी. लांबीमध्ये वन जमिन संपादनासाठी तत्वत: मंजूरी प्राप्त झाली आहे. विषयांकित लांबी भिमाशंकर अभयारण्याच्या १०.०० कि.मी. परिसरामध्ये येत असल्याने रिट याचिका क्र.१२७७/२००० नुसार उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर/राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (NGT) यांची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्याबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे. मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर लांबीतील काम हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावतीसाठी अकोला येथे उपमुख्य वास्तुशास्त्र कार्यालय मंजूर करण्याबाबत**

**(१०) ८२०३ (१०-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावतीसाठी अकोला येथे उपमुख्य वास्तुशास्त्र कार्यालय मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (अकोला प.) यांनी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू वास्तुशास्त्रज्ञ कार्यालय मंजूर करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय,
(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१५) :** (१), (२), (३) व (४)
सदर विषयाबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

---

**राज्याच्या समाजकल्याण मंत्रालयामार्फत मागासवर्गीयांना देण्यात येणा-या शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी तयार करण्यात आलेली वेबसाईट गेल्या सहा महिन्यांपासून बंद असल्याबाबत**

**(११) ८३०७ (०९-०४-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या समाजकल्याण मंत्रालयामार्फत मागासवर्गीयांना देण्यात येणा-या शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी तयार करण्यात आलेली वेबसाईट गेल्या सहा महिन्यांपासून बंद असल्याने राज्यातील १० लाखांहुन अधिक मध्यमवर्गीय विद्यार्थ्री शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०८-२०१५) :** (१) नाही. सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजने अंतर्गत मार्च, २०१५ अखेर १६५८२८० इतके ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव ते शेगांव या रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत**

**(१२) ८४९७ (१०-०४-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव ते शेगांव या रस्त्यावरुन श्री. संत गजानन महाराज शेगांव यांच्या दर्शनासाठी जाणा-या भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खामगांव ते शेगांव हा रा.मा. क्र. २४ या भागातील रस्त्याची लांबी १७.६० कि.मी. असून त्यापैकी शेगांव गावाजवळील ४.२० कि.मी. लांबीतील रस्त्यांचे चौपदरीकरण करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) तसेच उर्वरित लांबीतील चौपदरीकरणाचे कामांसाठी आवश्यक निधीची मंजूरी देण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०६-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) उर्वरित १३.४० कि.मी. लांबीपैकी कि.मी. १.३० लांबीच्या चौपदरीकरणासाठी रु. २०० लक्ष इतक्या रकमेस मंजूरी देण्यात आली आहे.

उर्वरित लांबीतील चौपदरीकरणाचे काम आवश्यकतेनुसार मंजूरी, निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एम.आय.डी.सी.कडून उल्हास नदीतून वाढीव पाणी उचल थांबविण्याबाबत**

**(१३) ८६३१ (०७-०४-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एम.आय.डी.सी.कडून उल्हासनदीतून वाढीव पाणी उचल चालू असल्यामुळे व सन २०१४-१५ करीता उल्हासनदी पात्रात १४ टक्के पाणी कपात लागू आहे, अशा स्थितीत निश्चित केलेल्या कोट्याप्रमाणे पाणी उचलणे आवश्यक आहे असे न झाल्यास भविष्यात भीषण पाणी टंचाई निर्माण होईल व याचा उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रात फटका बसेल, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम.आय.डी.सी. कडून वाढीव पाणी उचल त्वरीत थांबविणे करीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०८-२०१५) :**(१) हे खरे नाही, उल्हासनदीतील पाण्याची मागणी व उल्हास नदी तसेच बारवी धरणातील पाण्याची उपलब्धता पाहून पाण्याचे नियोजन जलसंपदा विभागाकडून करण्यात येते. सद्यःस्थितीत उल्हास नदी व बारवी धरणात पाण्याची उपलब्धता कमी असल्याने जलसंपदा विभागाने डिसेंबर, २०१४ पासून ते जुलै, २०१५ पर्यंत पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने १४% पाणी कपात लागू केली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत उल्हासनगर महानगरपालिकेला १२० द.ल.प्र.दि. पाणी पुरविण्याचे मान्य केले होते. तथापि, उल्हासनगर महानगरपालिकेची मागणी दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे शुक्रवार वगळता सुमारे १६५ द.ल.ली.प्र.दि इतका पाणीपुरवठा उल्हासनगर महानगरपालिकेला सद्यःस्थितीत करण्यात येत आहे.

(२) महामंडळाने केलेल्या करारनाम्यानुसार जुलै, २०१६ पर्यंत उल्हासनदीतून ७७० द.ल.ली.पाणी उचलण्यास जलसंपदा विभागाने मंजूरी दिली आहे. तथापि, जलसंपदा विभागाने १४ टक्के पाण्याची कपात केल्यामुळे सद्यःस्थितीत महामंडळाकडून उल्हासनदीतून ६६० द.ल.घ.मी. पाणी उचलण्यास येते. त्यामुळे महामंडळाकडून उल्हास नदीतून वाढीव पाणी उचलण्यात येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जात पडताळणी समितीमधील अधिका-यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(१४) १०१४६ (२०-०४-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जात पडताळणी समितीच्या वतीने १५ विभागामार्फत जात पडताळणीचे कामकाज सुरु आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या जात पडताळणी समितीमधील अधिका-यांची पदे रिक्त असल्याने हजारो जात पडताळणीचे प्रस्ताव प्रलंबित आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त कर्मचारी व अधिका-यांची पदे भरुन तसेच जात पडताळणीचे प्रस्ताव निर्गमित करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०७-२०१५) :** (१) होय.

(२) जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या रिक्त पदांचा अतिरिकत कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे सोपवून प्रकरणे निकाली काढण्यात येत आहेत.

(३) या संदर्भात पद भरण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु असून उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यास्तरावर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील औद्योगिक विकास महामंडळ कर्मचाऱ्यांच्या वसाहतीत मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू असल्याबाबत

**(१५) ११००४ (०६-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनामार्फत जिल्ह्यात शतकोटी वृक्षलागवडीचा उपक्रम हाती घेण्यात येऊन जिल्हा हिरवाईने नटविण्याचे काम सुरु असताना परभणी जिल्ह्यातील औद्योगिक विकास महामंडळ कर्मचाऱ्यांच्या वसाहतीत मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तद्‌नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (२२-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे रस्त्यालगतची व कर्मचारी वसाहतीमधील सुबाभळीची झाडे उन्मळून कर्मचाऱ्यांच्या वसाहतीमध्ये, कार्यालयीन इमारत व संरक्षण भिंत

यावर पडली होती. त्यामुळे विभागीय कार्यालयाच्या अनुमतीने उन्मळून पडलेली झाडे तोडण्यात आलेली असून, सुस्थितीमध्ये असलेले एकही झाड तोडण्यात आलेले नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राज्यातील उद्योग आणि कारखाने यांच्यामुळे मिळणाऱ्या रोजगारात मोठी घट झाल्याबाबत**

**(१६) ११०६६ (१०-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उद्योग आणि कारखाने यांच्यामुळे मिळणाऱ्या रोजगारात मोठी घट झाल्याचे उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षणातून दिसून आल्याची बाब जानेवारी २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संघटीत औद्योगिक क्षेत्रातील रोजगार घटला असून कंत्राटी नोकरांची संख्या वाढत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, औद्योगिक क्षेत्रातील रोजगाराची उपलब्धता वाढण्यासाठी शासन काय कारवाई करत आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. सुभाष देसाई (१०-०६-२०१५) :** (१) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल सन २०१४-१५ च्या सर्वेक्षणानुसार राज्यात औद्योगिक गुंतवणुकीसह रोजगारात देखील वाढ होत आहे. वर्ष निहाय औद्योगिक गुंतवणुक व रोजगार खालील प्रमाणे आहे.

| सन | सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | गुंतवणूक (रु.कोटी) | रोजगार (लक्ष) |
|---|---|---|---|
| २०११-१२ | १५,६०६ | ४,४४३ | २.०७ |
| २०१२-१३ | १६,१३६ | ५,४५५ | २.०६ |
| २०१३-१४ | १९,८१४ | ६,३५८ | २.४८ |
| २०१४-१५ | २४,८९४ | ५,३५५ | २.९२ |

(२), (३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## चोपडा येथील ( जि.जळगांव) रस्त्यांवरील पुलाच्या दुरुस्तीबाबत

**(१७) ११२२४ (१०-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा येथील (जि.जळगांव) रस्त्यांवरील पुल सन २००६ च्या अतिवृष्टीत वाहून गेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या रस्त्यांची व पुलांची दुरुस्ती अभावी अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुरुस्तीसाठी बांधकाम विभागाने अंदाजपत्रक शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ह्या रस्त्यांच्या व पुलाच्या दुरुस्तीसाठी शासनाने निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०६-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

सन २००६ च्या अतिवृष्टीत चोपडा तालुक्यातील काही पुलांचे जोडरस्त्याचे भराव तथा रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडून रस्ते नादुरुस्त झाले होते.

(२) हे खरे नाही.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले जोडरस्ते तसेच रस्त्यावर पडलेले खड्डे भरुन रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.

(३) व (४) सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरीता क्षेत्रिय कार्यालयाकडून निधीची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार पुरहानी दुरुस्तीसाठी राज्यक्षेत्राकडे रु.८८.१६ लक्ष व स्थानिक क्षेत्राकडे रु.४२ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदनगर येथील औद्योगिक वसाहतीसाठी पायाभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(१८) ११३५१ (०९-०४-२०१५). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथे असलेल्या औद्योगिक वसाहतीसाठी पुणे, औरंगाबाद आणि नाशिक जिल्हयामध्ये पायाभूत सुविधांचा अभाव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त औद्योगिक वसाहतीचा विकास व्हावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०६-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

अहमदनगर येथे ५९६ हेक्टर जागेवर औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यात आले असून, तेथे ३६.५० कि.मी. एवढे रस्त्याचे डांबरीकरण केले आहे व सदर औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना २४ तास पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून मुळा धरणातून २३.१९ द.ल.घ.मी. इतके पाण्याचे आरक्षण घेतले आहे व औद्योगिक क्षेत्रास ६००० द.ल.ली. प्रति दिन पाणी पुरवठा केला जातो. तसेच सदर औद्योगिक क्षेत्रातंर्गत सामाईक सुविधा केंद्र, बँक, पोस्ट ऑफिस, कॅन्टीन, हॉटेल, शाळा, रहिवासी विभाग इत्यादी सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत व अग्निशमन केंद्र यंत्रणा देखील कार्यान्वित करण्यात आलेली आहे व माहिती तंत्रज्ञानासाठी माहिती तंत्रज्ञान उद्यान इमारत बांधण्यात आली आहे. तसेच माहिती व तंत्रज्ञान उद्योजकांसाठी नवीन भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम येथील महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास मंडळाचे २१९ हेक्टर क्षेत्रातील जमीनीपैकी फक्त ४२.२ हेक्टर विकसीत झाली असल्याबाबत**

**(१९) ११५१३ (०९-०४-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम येथील महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास मंडळाचे २१९ हेक्टर क्षेत्रातील जमीनीपैकी फक्त ४२.२ हेक्टर विकसीत झाली असल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एम.आय.डी.सी मध्ये पथदिवे, रस्ते, पाण्याची सोय अशा मुलभूत सुविधांच्या अभावी या ठिकाणी उद्योजकांत नैराश्य असल्याचे समोर आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. सुभाष देसाई (१५-०६-२०१५) :**(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने वाशिम विकास केंद्रासाठी २१५.७१ हे.आर इतके क्षेत्र भूसंपादित केले आहे. त्यापैकी ४८.४९ हे.आर क्षेत्रात एकूण ९७ भूखंडाचे आरेखन करण्यात आले असून त्यापैकी ६० भूखंडाचे वाटप करण्यात आले आहेत.

(२) व (३) वाशिम विकास केंद्रासाठी महामंडळाने एकूण २.५७ कि.मी. लांबीचे खडी-मुरुमाचे रस्त्याचे काम पूर्ण केले सून त्यवर प्राथमिक डांबरीकरण करण्याचे काम प्रस्तावित आहे. तसेच २.२७ कि.मी. लांबीची व १०० मि.मी. व्यासाची बिडाची अशुध्द पाणी पुरवठा जलवाहिनी टाकलेली आहे व ५०० घनमीटर क्षमतेचे जलकुंभ बांधण्यात आलेले असून, १०० मि.मी आणि १५० व्यासाची २.६५ कि.मी लांबीची अंतर्गत जलवाहिनी देखील टाकण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत उद्योजकांना महामंडळाच्या विहीरीतून १० घनमीटर प्रती दिन इतका पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

सदर औद्योगिक क्षेत्रासाठी ५ एमव्हीए क्षमतेचे विद्युत सबस्टेशनाचे काम पुर्ण करण्यात आले आहे. तर पथदिवे उभारण्याचे काम प्रस्तावित असून त्यास रु.५४.०७ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव वरिष्ठाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलडाणा येथील शहरालगत असलेल्या औद्योगिक विकास महामंडळा अंतर्गत जागेवर भुखंड घेवून उद्योग न सुरु करणा-याचे भुखंड रद्द करणेबाबत**

**(२०) ११६०५ (१०-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा येथील शहरालगत असलेल्या औद्योगिक विकास महामंडळा अंतर्गत विविध उद्योजक कंपन्यांना किती भुखंड उपलब्ध करण्यात आले आहे,
(२) असल्यास, राखीव भुखंडामधुन किती उद्योग कंपन्यांसाठी भुखंडाचे वाटप करण्यात आले आहे,
(३) असल्यास, यापैकी किती भुखंडावर सध्यःस्थितीत उद्योग सुरु आहे,
(४) असल्यास, भुखंड वाटप करण्यात आले परंतु अद्यापही उद्योग सुरु केले नसल्याचे भुखंडाची संख्या किती आहे,
(५) असल्यास, वर्षानुवर्ष उपरोक्त जागेवर भुखंड घेवून उद्योग न सुरु करणा-याचे भुखंड रद्द करणेबाबत व नविन उद्योजकांना भुखंड वाटप करणे बाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०८-२०१५) :**(१) बुलडाणा शहरालगत असलेल्या औद्योगिक क्षेत्रातील २४ उद्योजकांना भूखंड वाटप करण्यात आले आहेत.
(२) राखीव असलेल्या भूखंडांतून उद्योजकांना भूखंडाचे वाटप करण्यात आले नाही.
(३) व (४) उद्योजकांना वाटप करण्यात आलेल्या २४ भूखंडांपैकी ९ भूखंडांवर उद्योग सुरु आहेत उर्वरित १५ भूखंडावर अद्याप उद्योग सुरु झालेले नाहीत.
(५) बुलडाणा शहरालगत असलेल्या औद्योगिक क्षेत्रातील वाटप करण्यात आलेल्या भूखंडांपैकी ज्या भूखंडधारकांनी विहीत केलेल्या कालावधीत भूखंडांचा विकास केला नाही. अशा ८ भूखंड धारकांना नोटीसा देण्यात आल्या होत्या. त्यापैकी ४ भूखंड परत महामंडळाच्या ताब्यात घेण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे वडगाव (ता.जि.उस्मानाबाद) येथील जागेवर औद्योगिक वसाहत विकसित करण्याबाबत**

**(२१) ११७८३ (१०-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वडगाव (ता.जि.उस्मानाबाद) येथे ५०० एकर जागेवर औद्योगिक वसाहत विकसित करण्याच्या स्थानिक प्रतिनिधींच्या वारंवार होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने मा.उद्योग मंत्री यांच्याकडे दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ रोजी बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०६-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे वडगांव (सिध्देश्वर) जि. उस्मानाबाद येथे औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यासाठी १४८.५३ हे. आर क्षेत्र अधिसूचित करण्यात आले असून, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी संबंधित खातेदारांशी बैठक आयोजित करून नुकसान भरपाईचे दर वाटाघाटीने निश्चित करण्यासंबंधीची कार्यवाही सुरु केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कौडगाव (जि.उस्मानाबाद) येथील औद्योगिक वसाहती जवळची बार्शी तालुक्यातील जमीन संपादित करण्याबाबत**

**(२२) ११७८४ (१०-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कौडगाव (जि.उस्मानाबाद) येथील M.I.D.C. औद्योगिक वसाहती लगतची बार्शी तालुक्यातील १००० एकर जमीन संपादित करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने मा.उद्योग मंत्री यांच्याकडे दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ रोजी बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०६-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) मौजे कौडगाव (जि.उस्मानाबाद) येथे औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यासाठी ३२६.१६ हे.आर खाजगी क्षेत्र व १२९.९७ हे.आर सरकारी क्षेत्र असे एकूण ४५६.१३ हे.आर क्षेत्र अधिसूचित करण्यात आले असून त्यापैकी १७९.५९ हे.आर क्षेत्रांची संयुक्त मोजणी झालेली असून, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम ३२ (१) नुसार अधिसूचना प्रसिध्द

करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर क्षेत्राचे मुल्यांकन करणे व नुकसान भरपाईचा दर ठरविणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात निराधारांना निर्वाहासाठी अनुदान देण्याबाबत

**(२३) ११७९४ (०९-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विविध निराधार योजनेंतर्गत निराधारांना निर्वाहासाठी अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत निराधारांना निर्वाह अनुदानासाठी माहे फेब्रुवारी, २०१५ अखेर किती रक्कम देय आहे,
(३) असल्यास, उस्मानाबाद जिल्ह्यातील किती निराधारांना अनुदान देय आहे व किती रक्कम देय आहे,
(४) असल्यास, देय अनुदान केव्हापर्यंत देण्यात येईल,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उस्मानाबाद जिल्ह्यातील विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गत येणा-या सर्व लाभार्थ्यांना माहे फेब्रुवारी, २०१५ अखेर पर्यंतचे अनुदान वाटप करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहमदनगर शहरात नागपूर एमआयडीसी फेज २, फेज ३ यांच्या जमिनी संपादित करण्याबाबत

**(२४) ११८२७ (०९-०४-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर शहरात नागपूर एमआयडीसी फेज २, फेज ३ यांच्या जमिनी संपादित करण्याचे काम सुरू होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात किती जमिनी संपादित झालेल्या आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१५-०६-२०१५) :**(१) व (२) अहमदनगर औद्योगिक क्षेत्राच्या फेज २ व फेज ३ साठी अनुक्रमे वडगांव गुप्ता येथील २२०.७५ हे आर खाजगी व २३.६७.७४ हे आर सरकारी

तसेच पिंपळगांव माळवी येथील क्षेत्रासाठी २१७.३२ हे आर खाजगी असे एकूण ४६१.७४.७४ हे आर क्षेत्र अधिसूचित करण्याची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. तथापि, काही खातेदारांनी विरोध केल्यामुळे भूसंपादनाची पुढील कार्यवाही झालेली नाही. परंतू, मौजे वडगांव गुप्ता येथील क्षेत्रासाठी संबंधित खातेदारांसोबत नुकसान भरपाईचे दर वाटाघाटीने ठरविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या समवेत बैठक आयोजित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कसारा घाटातील कॅच वॉटर ड्रेन संदर्भातील प्रस्तावाबाबत**

**(२५) ११८५७ (१८-०४-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसारा घाटातील कॅच वॉटर ड्रेन संदर्भात उप संरक्षक अधिकारी, वन विभाग, शहापूर यांनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे परवानगीसाठी दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने उप संरक्षक अधिकारी, वन विभाग, शहापूर यांच्याकडे उक्त कामांबाबत तपशील नकाशासह दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास प्रस्ताव मागविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०६-२०१५) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ०१.१२.२०१४ च्या बैठकीमध्ये कॅच वॉटर ड्रेन बांधण्याच्या कामास मुख्य वनसंरक्षक, ठाणे व उपसंरक्षक अधिकारी, वन विभाग, शहापूर यांनी अडथळा आणू नये, अशा सूचना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिष्यवृत्ती वाटपास बँकेकडून टाळाटाळ होत असल्याबाबत.**

**(२६) ११९०५ (१०-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील समाजकल्याण विभागाची प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती वाटपास बँकेकडून टाळाटाळ केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाटपाविना शिष्यवृत्ती बँकेत पडून आहे असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले तसेच संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-०७-२०१५) :** (१) व (२) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दिलेल्या यादीप्रमाणे विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम बँकेने उशिरा जमा केली आहे. तसेच खाते क्रमांक चुकलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम बँकेकडे शिल्लक आहे.
(३) मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी बँकेकडे सुपूर्द करण्यात आली होती. तथापि, संबंधित बँकेकडून विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा न झाल्याने बँकेचे अधिकारी यांचे समवेत बैठक घेऊन विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार बँकेने ८२,१३९ विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीची जमा केली आहे. तसेच बँक खाते क्रमांक चुकीचे दिल्यामुळे ३३५८ विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम बँकेत शिल्लक असून त्यांचे खाते क्रमांक सुधारित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिंपी जातीचा उल्लेख नामदेव शिंपी असा करणेबाबत**

**(२७) ११९६५ (१०-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाचे परिपत्रक दिनांक २६ सप्टेंबर, २००८ मध्ये अ.क्र. १५३ मध्ये शिंपी जातीचा उल्लेख असून 'नामदेव शिंपी' असा स्पेसिफीक उल्लेख नसल्यामुळे समाजास इतर मागासवर्गीयांच्या सोयी सवलती प्राप्त होत नसल्याने परिपत्रकात दुरुस्ती करण्याची मागणी नामदेव समाजोन्नती परिषद या संघटनेने व प्रस्तुत लोकप्रतिनिधींनी मा.सामाजिक न्यायमंत्री व मुख्यमंत्री यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाबाबत शासनाने चौकशी केली आहे व त्यानुषंगाने चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०७-२०१५) :**(१) होय.
(२) या विभागाच्या दिनांक १-३-२०१४ च्या शासन निर्णयान्वये इतर मागासवर्ग यादीत क्र. १५३ व शिंपी जातीचा तत्सम म्हणून नामदेव शिंपी या तत्सम जातीचा समावेश करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील होलार समाजाच्या चुकीच्या जातीची नोंद झालेली असल्याबाबत**

**(२८) ११९६६ (१०-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील होलार समाजाची काही जिल्ह्यामध्ये चुकीच्या जातीची नोंद झालेली असल्यामुळे जाती दाखल्यासाठी सन १९५० च्या पुराव्याची अट शिथील करावी अशी मागणी होलार समाजाच्यावतीने व प्रस्तुत लोकप्रतिनिधींनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर २०१३ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-०८-२०१५) :**(१) व (२) सदरचे निवेदन कार्यासनातील अभिलेखात आढळून आले नाही.

तथापि, याच विषयाबाबतच्या अन्य निवेदनाच्या अनुषंगाने यासंदर्भातील शासन निर्णय दि.६/२/२०१० मधील तरतूदीनुसार सन १९५० चा पुरावा तपासून त्याप्रमाणे दुरुस्ती करुन जातवैधता प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना वेळोवळी देण्यात आल्या आहेत. जात प्रमाणपत्र सुलभरित्या मिळण्याकरीता संबंधित जिल्हाधिकारी यांना सुचना देण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात जात पडताळणी समितीवरील अध्यक्षांच्या ५० टक्के जागा समाजकल्याण विभागातील अधिका-यांसाठी राखीव ठेवण्याबाबत**

**(२९) १२४९१ (१०-०४-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जात पडताळणी समितीवरील अध्यक्षांच्या ५० टक्के जागा समाजकल्याण विभागातील अधिका-यांसाठी राखीव ठेवाव्यात अशी शिफारस श्री. सहारिया समितीने करुनही अद्याप त्याची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जातपडताळणी समितीवरील अध्यक्षांच्या १५ पदांपैकी ६ पदे उपआयुक्त तथा सदस्य यांचे पद रिक्त असणे व सदस्य सचिव यांची ४ पदे रिक्त असल्याने जात पडताळणी दाखले मिळण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०७-२०१५) :** (१) अशी शिफारस समितीने केलेली नाही.
(२) व (३) सदयस्थित १५ समित्यांवरील अध्यक्षांची १०, सदस्यांची ३ तर सदस्य सचिवांची ३ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिका-यांकडे सोपवून कामकाज हाताळण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील शासकीय वसतिगृहातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(३०) १२८८५ (१०-०४-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील शासकीय वसतिगृहातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्यात ६ महिने विलंब झाल्यामुळे या विद्यार्थ्यांची आर्थिक छळवणूक होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यांस जबाबदार असणा-या प्रादेशिक उपायुक्त व सहायक आयुक्त, समाजकल्याण, नाशिक यांचेविरुध्द कायदयानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०७-२०१५) :** (१) नाही,
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील शासकीय वसतिगृहातील आर्ट-कॉमर्स-सायन्स, वैद्‌यकीय व अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना वेळेवर पुस्तकांचा पुरवठा करण्यात न आल्याबाबत**

**(३१) १२८८९ (१०-०४-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील शासकीय वसतिगृहातील आर्ट-कॉमर्स-सायन्स, वैद्‌यकीय व अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना सन २०१४-१५ हया शैक्षणिक वर्षाचे दुसरे सत्र सुरु झाले असतानाही पुस्तकांचा पुरवठा करण्यात न आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच

जबाबदार असणा-या प्रादेशिक उपायुक्त व सहायक आयुक्त, समाजकल्याण, नाशिक यांचेविरुध्द कायदयानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०७-२०१५) :**(१) नाही, हे खरे नाही.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरीतील जात - पडताळणी समितीतील अध्यक्ष व इतर रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३२) १२८९५ (१०-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरीतील जात - पडताळणी समिती क्र.२ मध्ये रत्नागिरी - सिंधुदुर्ग दोन्ही जिल्हयातील जात प्रमाणपत्रांची पडताळणी करुन जात वैधता प्रमाणपत्र दिले जाते, परंतु या समितीला कायमस्वरुपी अध्यक्ष नसल्यामुळे जात प्रमाणपत्रांची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कार्यालयात अनेक पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त समितीवर अध्यक्ष व रिक्त पदे भरण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी मा.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री महोदयांना पत्रव्यवहार करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही हे खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०७-२०१५) :**(१) विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. २, रत्नागिरी या समितीच्या रिक्त असलेल्या अध्यक्ष पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिका-यांकडे सोपवुन प्रकरणे निकाली काढण्यात येत आहेत.
(२) या कार्यालयासाठी मंजूर असलेल्या १९ पदांपैकी ८ पदे भरण्यात आलेली असून, समितीस आवश्यक ते मनुष्यबळ करार पध्दतीने उपलब्ध करुन दिले आहे.
(३) या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीचे निवेदन प्राप्त झालेले असून अध्यक्षांचे पद भरण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु असून उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यास्तरावर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी बांधण्यात आलेल्या शासकीय वसतिगृहात औद्योगिक प्रशिक्षण संस्था वा तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना स्थान न दिल्याबाबत**

**(३३) १३०५५ (१०-०४-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागासवर्गीयांमधील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांसाठी ३८१ शासकीय वसतिगृहे बांधण्यात आली असून सर्वच वसतिगृहांमध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली मात्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), अभियांत्रिकी, वा तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना त्यात स्थान देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात पुणे येथे समाजकल्याण आयुक्तांना दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांना विद्यार्थ्यांनी निवेदन दिले आहे, त्यानुसार प्रवेश धोरणात बदल करण्यात यावा असे सूचविण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आयटीआय आणि अभियांत्रिकी पदविका उत्तीर्ण होऊन पदवीच्या द्वितीय वर्षाला प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशाची दारे बंद करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनातर्फे सदर प्रकरणी कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे वा प्रस्तावित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०७-२०१५) :** (१) नाही.

(२) होय.

(३) नाही.

(४) अभियांत्रिकी तसेच इतर तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना प्रत्येक शासकीय वसतीगृहामध्ये निश्चित करुन दिलेल्या कोटयानुसार प्रवेश देण्यात येतो.

तथापि, डिप्लोमा पूर्ण होऊन अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व आयटीआय पूर्ण होऊन पॉलीटेक्नीकला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतीगृह प्रवेशाबाबतच्या प्रचलित धोरणात दि. १८/३/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये बदल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरालगत असलेल्या चिखलठाणा औद्योगिक क्षेत्रातील ए.पी.आय. कंपनी ची विक्री झाल्यानंतर, रहिवाशी क्षेत्रासाठी आरक्षित असलेल्या जागेवर कामगारांसाठी रो-हाऊसिंगची घरे बांधण्यात आल्याबाबत**

**(३४) १३२३२ (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरालगत असलेल्या चिखलठाणा औद्योगिक क्षेत्रातील ए.पी.आय. कंपनीची विक्री झाल्यानंतर, रहिवाशी क्षेत्रासाठी आरक्षित असलेल्या जागेवर कामगारांसाठी रो-हाऊसिंगची घरे बांधण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगारांसाठी बांधलेल्या या ५८ घरामध्ये कामगारांव्यक्तीरिक्त व्यक्तींना घरे विक्री करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फक्त कामगारांसाठी असलेल्या जागेवर, फक्त कामगारांसाठी बांधलेली घरे कामगार नसलेल्या व्यक्तींना विक्री करण्यात आली आहेत, अशा व्यक्तींकडून शासन घरे परत घेणार काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०८-२०१५) :**(१), (२) व (३) मे.ए.पी.आय.लि. कंपनी आजारी उद्योगामध्ये समाविष्ट झाल्यामुळे त्यांच्याकडील देणी भागविण्यासाठी चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र.डी-५ हा विक्री करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सदर भूखंडाचे विभाजन करुन २०७६८ चौ.मी. इतक्या क्षेत्राचा विभाजित भूखंड क्र. आर.एच. ७ हा रहिवाशांच्या प्रयोजनासाठी मे.हरे रामा हरे कृष्णा को.ऑप.हॉसिंग सोसा. यांच्या नावाने हस्तांतरीत करण्यात आला आहे व त्यांनी महामंडळाचा विकास करुन त्यावर बांधण्यात आलेली घरे ही फक्त (suitable person) या व्याख्येमध्ये बसणा-या व्यक्तींना हस्तांतरीत करणे बंधनकारक केले आहे.

सदर सोसायटीने दि.१५/२/२०११ व दि. १७/०५/२०१३ रोजी अनुक्रमे ४८ व १९४ व्यक्तींच्या नावाने घराचे हस्तांतरण करण्यासंबंधीचा प्रस्ताव महामंडळाकडे सादर केला होता. परंतू, प्रस्तावात नमूद केलेल्या व्यक्ती suitable person या व्याख्येमध्ये बसत नसल्यामुळे प्रस्ताव नाकारण्यात आला व महामंडळाच्या परवानगी शिवाय कोणत्याही सभासदासोबत करण्यात आलेले agreement to sale किंवा sale Deed ग्राहय धरण्यात येणार नाही व अशा केलेल्या करारपत्रास महामंडळ बांधील राहणार नाही, असे देखील सदर सोसायटीस कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.वळदगांव (ता.जि.औरंगाबाद) येथील शासकीय गायरान जमिन विनावापर पडून असल्याबाबत**

**(३५) १३२४० (१०-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.वळदगांव (ता.जि.औरंगाबाद) येथील शासकीय गायरान जमिन ग.क्रं. १७५ मधील एकूण २३ हे. ९ आर.क्षेत्रापैकी ९ हे ४० आर जमीन एम.आ.डी.सी. वाळूंजला वर्ष १९८४ मध्ये हस्तांतरीत झाली आहे,

(२) असल्यास, संपादीत व हस्तांतरीत झालेल्या जमीनीवरील सर्व भुखंड विनावापर पडून आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गट क्रं. १७५ मधील शिल्लक असलेल्या शासकीय जमीनीवर एम.आय.डी.सी. वाळुंजने आपली जमीन दाखवून काही भुखंडावर अतिक्रमण करुन बेकायदेशीररित्या भुखंड वाटप केले आहेत व उर्वरीत शासकीय जमीनीवर अतिक्रमण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय व त्यात काय आढ्ळून आले तसेच दोषी अधिका-यांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०८-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने वाळुंज औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे वळदगांव येथील सरकारी क्षेत्रातील गट नं. १७५ मधील ९.४० हे. आर. इतक्या क्षेत्रापैकी ५.८१ हे. आर इतक्या क्षेत्राचा ताबा तहसिलदार, औरंगाबाद यांच्याकडून महामंडळास प्राप्त झाला होता. त्यावर महामंडळाने भूखंड आरेखित करुन भूखंड क्र.पी-१२ चे ५१४६१ चौ.मी. इतके क्षेत्र असलेला भूखंड एस.टी.महामंडळास बसस्टँडच्या इमारतीसाठी वाटप केला होता.

तथापि, एस.टी. महामंडळाने फक्त १०९६० चौ.मी. इतक्या क्षेत्रावर इमारतीचे बांधकाम केले आहे. त्यामुळे उर्वरित ४०५०१ चौ.मी. क्षेत्राचा वापर विहीत मुदतीत न केल्यामुळे महामंडळाने सदर क्षेत्र त्यांच्याकडून परत घेवून त्यावर ३२ भूखंडाचे आरेखन करुन ते गरजू उद्योजकांस वाटप करण्यात आले आहे व त्यावर उद्योग देखील सुरु केलेले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्हयातील परवानाधारक सावकारांनी शेतक-यांना दिलेल्या कर्ज वाटपाची सखोल चौकशी करण्याबाबत**

**(३६) १३३०४ (०९-०४-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील परवानाधारक सावकारांनी शेतक-यांना दिलेल्या कर्ज वाटपाची सखोल चौकशी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर यांनी, दिनांक २० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले व सावकारांनी किती शेतक-यांना एकूण किती रूपयांचे कर्ज वितरीत केले आहे,
(३) असल्यास, सदर कर्ज माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०७-२०१५)** :(१) व (२) सावकाराकडून शेतक-यांनी व बिगरशेतक-यांनी घेतलेल्या कर्जाची विहीत नमुन्यात माहिती मागविण्यात आली असता, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्याकडून प्राप्त माहितीच्या अनुषंगाने लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील परवानाधारक सावकारांनी २२ शेतक-यांना रु. १.८३ लाख इतक्या कर्जाचे वाटप केल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) परवानाधारक सावकारांकडून विदर्भ मराठवाड्यातील शेतक-यांनी घेतलेले कर्ज अदा करण्यासाठी दि. ३ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये रु. ५० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील समाजकल्याण विभागाच्या वसतिगृह व निवासी शाळेतील विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांबाबत**

**(३७) १३३३४ (१०-०४-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील समाजकल्याण विभागाच्या वसतिगृह व निवासी शाळेतील विद्यार्थ्यांच्या विविध समस्या व प्रश्नासंदर्भात एका राजकीय पक्षाच्या वतीने दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास नासर्डी पूल येथील समाजकल्याण विभागाच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विद्यार्थ्यांच्या समस्यांसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०७-२०१५)** :(१) दि. २९/१२/२०१४ रोजी श्री जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्र नव निर्माण विद्यार्थी सेना, नाशिक यांनी वसतीगृहातील समस्येबाबत निवेदन दिलेले आहे.
(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे :-
(१) वसतीगृहातील सर्व विद्यार्थ्यांना २ गणवेश पुरविण्यात आलेले आहेत. (२) वसतीगृहातील विद्यार्थ्यांना पुस्तक संच उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. (३) विद्यार्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार नाष्टा व भोजन दिले जाते. (४) विद्यार्थ्यांना उत्कृष्ट व चविष्ट् भोजन व नाष्टा देण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. (५) विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे मटण

पुरविण्यात येते. (६) विद्यार्थ्यांना उपलब्ध तरतुदीनुसार निर्वाह भत्ता वेळेवर देण्यात येतो. (७) शासनांच्या धोरणाप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी रु.५००/- त्यांच्या बॅक खात्यात जमा करण्यात आलेले आहेत. (८) मुलांचे वसतीगृह आडगाव येथील सोलर वॉटर हिटरच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे. (९) सर्व सवतीगृहात वॉटर कुलर सुरु असल्याने विद्यार्थ्यांना शुध्द पाणी मिळत आहे. (१०) विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार सर्व वसतीगृहांना गाद्या, कॉट पुरविण्यात आल्या आहेत. (११) आडगाव येथील वसतीगृहात पुरेसे पाणी उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांना पाण्यासाठी कोठेही बाहेर जावे लागत नाही. तरी नाशिक जिल्हयातील वसतीगृहातील विद्यार्थ्यांना नियमानुसार देय होणाऱ्या सर्व सोयीसुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव येथील धुळे-औरंगाबाद-चाळीसगांव बायपास खडकी शिवारातील टोलनाक्यावर वाहनधारकांची अवैध टोल वसुली होत असल्याबाबत**

**(३८) १३४०४ (०९-०४-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव येथील धुळे-औरंगाबाद-चाळीसगांव बायपास खडकी शिवारातील टोलनाक्यावर वाहनधारकांची प्रचंड प्रमाणावर आर्थिक लूट करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१० पासून एकाने सब एजन्सीवर हा टोल भाडयाने घेतला असून चालक झिरो धुळे पॉईंट ते झिरो कन्नड या ९ कि.मी. अंतराचे १० टॉवर लोड गाडीचे फक्त ५० टक्के रुपये भाडे होत असताना १५५ रुपये असा अवाजवी टोल वसूल करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच रस्ते विकास लि. च्या करारानुसार दर ३ महिन्याच्या आत रस्ता दुरुस्ती केली पाहिजे असे असताना सदर मार्गावर त्याची अंमलबजावणी करण्यात येते काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर टोलनाक्याविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०३-२०१६) :** (१) नाही.
(२) हे खरे नाही. सदर पथकर नाक्यावर पथकर वसुली शासकीय अधिसूचनेतील मंजूर दरानुसार करण्यात येत आहे, याची या कार्यालयामार्फत खात्री केलेली आहे.
(३) मंजूर निविदा करारामधील रस्ता दुरुस्तीच्या वेळापत्रकानुसार रस्त्याची देखभाल दुरुस्ती कंत्राटदारामार्फत करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आकोट, तेल्हारा (जि.अकोला) तालुक्याच्या एमआयडीसी परिसरातील मुलभूत सुविधांबाबत

**(३९) १३५४६ (१०-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकोट, तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यात एमआयडीसी परिसरात रस्ते, पाणी, पथदिवे आदि मुलभूत सुविधांचा एमआयडीसी अधिका-यांच्या दुर्लक्षित पणामुळे अभाव असल्याने येथील उद्योजक त्रस्त झाले आहे . तसेच या सुविधा उपलब्ध झाल्यास नवीन उद्योगांना चालना मिळेल, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात भुखंड शिल्लक नसल्यामुळे नविन उद्योजकांना संधी मिळत नाही त्यामुळे स्थानिक उद्योजकांना नविन औद्योगिक वसाहत प्रस्तावीत करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने चौकशी केली काय, त्यात काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०८-२०१५) :** (१) अकोट लघु औद्योगिक क्षेत्रात ०.५८ कि.मी. लांबीचे खडी मुरुमाचे रस्ते व २..६५ कि.मी. लांबीचे डांबरी रस्ते तसेच ०.३० कि.मी. लांबीची १०० मी. मी. ची व्यासाची पाणीपुरवठा जलवाहिनी टाकण्यात आलेली आहे व ३० घ.मी. क्षमतेचा जलकुंभ बांधण्यात आलेला आहे. तसेच १०० मी.मी.व्यासाची व १४९ कि.मी. लांबीची अंतर्गत जलवितरीका देखील टाकण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत महामंडळाने बोअरवेल करुन उद्योजकांना २५ घ.मी. इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. तसेच सदर क्षेत्रामध्ये ८८ पथदिवे लावण्यात आले असून, ३३ के.व्हि.ए. क्षमतेचे विद्युत उपकेंद्र उभारण्यात आले असून त्यामार्फत वीजपुरवठा करण्यात येतो.

तेल्हारा औद्योगिक क्षेत्रासाठी ०.४४ कि.मी. लांबीची १०० मि.मी. व्यासाची पाणी पुरवठा जलवाहिनी टाकण्यात आली आहे व ३० घ.मी. क्षमतेचे जलकुंभ बांधण्यात आले आहे. सद्य:स्थितीत महामंडळाकडून बोअरवेल टाकण्यात आली असून त्यामार्फत उद्योजकांना १० घ.मी. प्रती दिन पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच सदर क्षेत्रात ४५ पथदिवे उभारण्यात आलेले आहेत.

(२) व (३) अकोट इंडस्ट्रियल असोसिएशन यांनी अकोट येथे वाढीव क्षेत्र स्थापनाची मागणी केली आहे. तथापि, तेल्हारा येथे वाढीव क्षेत्र स्थापनेबाबत मागणी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___________

## अंधेरी पूर्व येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंडावर सुरु असलेल्या झोपडपट्टी पुनवर्सन योजनेकरिता मोकळे भूखंड देण्याबाबत

**(४०) १३६७२ (१०-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी पूर्व येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंडावर सुरु असलेल्या झोपडपट्टी पुनवर्सन योजनेकरिता मोकळे भूखंड देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकांना उपरोक्त भूखंड कोणत्या अटी व शर्तीवर देण्यात आले आहेत, तसेच विकासकास देण्यात आलेल्या मोकळ्या भूखंडापैकी काही भूखंड विकास नियोजन आराखड्यानुसार सार्वजनिक उद्दिष्टांकरिता आरक्षित होते हे, खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकास देण्यात आलेल्या मोकळ्या भूखंडांवर विकासकाने झोपडपट्टीवासियांसाठी इमारती बांधल्या त्याचबरोबर त्याच भूखंडावर स्वतःच्या विक्रीकरिता इमारती बांधल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विकासकाने झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन केल्यानंतर रिक्त झालेले भूखंड सार्वजनिक आरक्षणाची पूर्तता करण्याकरिता औद्योगिक महामंडळास परत करण्यात आले आहेत काय,

(५) नसल्यास, औद्योगिक महामंडळास परत द्यावयाच्या भूखंडावरही विकासकाने विक्रीकरिता इमारती बांधल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकारच्या अनियमितता व भ्रष्टाचार याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचा-यांवर काय कारवाई करण्यात आली आहे किंवा करण्यात येणार आहे,

(७) उपरोक्त संपूर्ण अनियमितता नियमित करुन जनतेस हक्काच्या झोपड्या मिळाव्या व विकास नियोजन आराखड्यानुसार मोकळ्या भूखंडाचा विकास व्हावा याकरिता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०८-२०१५) :** (१), (२), (३), (४) व (५) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंडावर सुरु असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत ट्रॅझिट कॅम्पसाठी ३ मोकळे भूखंड ठेवण्यात आले होते. प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर विकासकाने सदर भूखंड महामंडळास परत द्यावयाचे होते. तद्नंतर संचालक मंडळाच्या बैठकीत १७८१७ चौ.मी. इतक्या (सिमाकंनानुसार) क्षेत्रफळाचे भूखंड विकासकास देण्यात आले व त्याबदल्यात विकासकाने तेवढ्याच क्षेत्रफळाचे भूखंड विना अतिक्रमीत व संरक्षक भिंत बांधून महामंडळास परत करावे, या अटीवर भूखंड देण्यात आले आहेत.

विकासकास विकास करण्यासाठी देण्यात आलेल्या ३ मोकळ्या भूखंडापैकी एका भूखंडावर पुनर्वसीत इमारतीचे तसेच विकासकाच्या विक्री करावयाच्या इमारतीचे बांधकाम केले आहे व एका भूखंडावर फक्त पुनर्वसीत इमारतीचे व उर्वरित एका भूखंडावर फक्त विकासकाच्या विक्री करावयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे.

सदर योजना अद्यापही प्रगतीपथावर असल्यामुळे विकासकामार्फत अद्यापपर्यंत मोकळ्या भूखंडापोटीचे क्षेत्र महामंडळास उपलब्ध झालेले नाही. तसेच हे क्षेत्र सार्वजनिक आरक्षणाकरिता नसून मोकळे भूखंड हे क्षेत्र सार्वजनिक आरक्षणाकरीता नसून मोकळे भूखंड म्हणून राखीव होते.

(६) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत अनियमितता झालेली नाही.

(७) व (८) पश्न उद्भवत नाही.

---

**संत मिराबाई मुलींचे वसतीगृह, वरळी येथील स्थायी गृहपालाच्या गैरकारभाराबाबत**

**(४१) १४३३७ (१०-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत मिराबाई मुलींचे वसतीगृह वरळी येथील स्थायी गृहपालाच्या गैरकारभाराबाबत दिनांक १८ सप्टेंबर, २०१४ रोजी तसेच २९ सप्टेंबर, २०१४ श्री.शेरे सहा. आयुक्त समाजकल्याण मुंबई शहर यांचेकडे वसतिगृह विद्यार्थीनीनी तक्रार केली आहे काय,

(२) तसेच उक्त वसतीगृहातील विद्यार्थीनीनी असुविधांबाबत तक्रार केल्यामुळे वसतीगृह व्यवस्थापनाने मुलींना रात्रभर वसतीगृहाबाहेर ठेवण्याची भयंकर शिक्षा दिल्याची गंभीर घटना दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कु.वर्षा हौसे या विद्यार्थीनीने वसतिगृहातील निवासी विद्यार्थीनी असूनही एक रात्र रेल्वे स्टेशनवर काढावी लागल्यामुळे दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी वसतिगृह कार्यालयात आत्महत्या करण्याबाबतची धमकी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. राजकुमार बडोले (२४-०७-२०१५) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) शासन निर्णय, दि. २६/७/२०११ मधील सर्व देय सुविधाप्रमाणे सोयी-सुविधा तात्काळ देण्यात आल्या आहेत. मेस ठेकेदार बदलण्यात आला आहे व संबंधित कनिष्ठ लिपिक यांना निलंबीत करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तंत्रशिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेत गैरव्यवहार केल्याबाबत

**(४२) १४५५९ (१०-०४-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तंत्रशिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणा-या अल्पावधीच्या अभ्यासक्रमाकरिता शासनाच्या समाजकल्याण विभागाकडून या विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना लागु करण्यात आलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या खात्यात सरळ जमा करण्याचे प्रावधान आहे काय,

(३) असल्यास, असे असतांना विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती सरळ संस्थाचालकांच्या खात्यात जमा कशी झाली व याला जबाबदार कोण तसेच याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत गुन्हे दाखल झाले असुन जिल्हाधिकारी व समाजकल्याण विभागातील अधिका-यांनी मिळुन हा घोटाळा केला असल्याने संबधीत अधिका-यांवर कारवाई केली आहे काय व ती कोणत्या स्वरुपाची आहे,

(५) असल्यास, ६१ कोटी रुपये हे शासनाचे असल्याने संस्थाचालकाकडून ते वसूल केले जाणार काय व संस्थावर काय कारवाई करणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०८-२०१५) :**(१) नाही, तंत्रशिक्षण विभागामार्फत मान्यता देण्यात आलेल्या २ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमास शिष्यवृत्ती दिली जाते.

(२) ज्या अभ्यासक्रमांस शिष्यवृत्ती अनुज्ञेय आहे. अशा अभ्यासक्रमातील पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांन शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या बँक खात्यात व शिक्षण शुल्काची रक्कम महाविद्यालय खात्यात ईसीएस मार्फत जमा करण्यात येते.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डोणोली (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथे एम.आय.डी.सी. वसाहतीबाबत

**(४३) १४८१२ (१०-०४-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोणोली (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथे एम.आय.डी.सी. वसाहत मंजुर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसाहतीसाठी आवश्यक असणा-या जमिनींच्या संपादनाची कार्यवाही संत गतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, भुसंपादनाची कार्यवाही शासन पूर्ण करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०८-२०१५) :**(१), (२) व (३) डोणोली (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी सरकारी ५५.०० हे.आर व खाजगी ३४.९२ हे.आर. असे एकूण ८९.९२ हे.आर क्षेत्र अधिसूचित करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. तथापि, केंद्र शासनाच्या नवीन भूसंपादन कायदा, २०१३ नुसार भूसंपदान करण्यास तांत्रिक अडचण येत होती. तथापि, विधी व न्याय विभागाशी विचार विनिमय करुन सदर क्षेत्राची अधिसूचना प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील पायाभूत सुविधांअभावी उद्योजकांनी उद्योग सुरु केला नसल्याबाबत

**(४४) १४८२४ (१०-०४-२०१५). अॅड.संजय धोटे (राजूरा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यात असलेल्या एम.आय.डी.सी.च्या औद्योगिक क्षेत्रात पायाभुत सुविधा अभावी २५ वर्षे होऊनही उद्योजक आपले उद्योग सुरु करु शकले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ते, वीज, पाणी पुरवठा व इतर सुविधा यांची पुर्तता न झाल्याने जमीन परत घेण्याचे ठरले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने औद्योगिक क्षेत्रात नविन उद्योगाची उभारणी करण्यासाठी व उद्योजकांना आवश्यक सोई सुविधा देण्याच्या दृष्टीने काेणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०८-२०१५) :**(१) हे खरे नाही.

राजूरा जि.चंद्रपूर येथील लघु औद्योगिक क्षेत्रात ०.२६ कि.मी. लांबीचे खडी मातीचे रस्ते तयार करण्यात आले आहेत व जलवितरीका टाकण्यात आलेली आहे. तसेच पाणी पुरवठ्यासाठी १ बोअरवेल देखील घेण्यात आली होती. परंतू, उद्योजकांकडून पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे पाणी पुरवठा योजना बंद करावी लागली. सद्य:स्थितीत भूखंड रिकामे असून तेथे उद्योग उभारणी झालेली नाही.

तसेच ज्या उद्योजकांना भूखंड वाटप करण्यात आला व त्यांनी करारनाम्यात नमूद केलेल्या अटीनुसार विहीत कालावधीत भूखंड विकसीत केला नाही. त्यांना महामंडळाच्या धोरणानुसार कारणे दाखवा नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत.

राजुरा येथील लघु औद्योगिक क्षेत्रात वरील अनु. क्र. १ प्रमाणे पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच भूखंड धारकांची मागणी आल्यास अस्तित्वात असलेल्या खडी मुरुम केलेल्या रस्त्यांचे डांबरीकरण व पथदिवे लावण्याचे काम प्रस्तावित करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पैठण (जि.औरंगाबाद) येथील एमआयडीसीमधील जमिनीवर उद्योग उभारण्यात आले नसल्याबाबत**

**(४५) १५५९४ (१०-०४-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण (जि.औरंगाबाद) येथील एमआयडीसीमध्ये उद्योजकांनी जमिनी संपादित करूनही ब-याच वर्षाचा कालावधी उलटूनही अद्यापी सदर जमिनीवर उद्योग उभारण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने ज्या उद्योजकांनी संपादित केलेल्या जमिनीवर उद्योग न उभारल्यास त्या जमिनी शासनास परत करण्याचे आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत किती उद्योजकांनी जमिनी शासनास परत केल्या आहेत,
(४) नसल्यास, अशा उद्योजकांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२१-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.
पैठण औद्योगिक क्षेत्रामध्ये एकूण ३४९ भूखंड आरेखित करण्यात आले आहेत. त्यापैकी १७८ भूखंडावर प्रत्यक्ष उत्पादन सुरु आहे.
(२), (३) व (४) पैठण औद्योगिक क्षेत्रामध्ये ज्या उद्योजकांना भुखंडाचे वाटप करण्यात आले आहे व ज्यांनी विहित मुदतीत भूखंडाचा विकास केला नाही अशा एकूण ३५ भूखंडधारकांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. त्यापैकी १८ भूखंड परत घेण्यात आले असून ५ भूखंड धारकांना परत घेण्यासंदर्भात दुसरी नोटीस देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तळेगाव येथे बायोमेट्रिकच्या नावाखाली अनुदानित वसतिगृह कर्मचाऱ्यांना मानधन न दिल्याबाबत**

**(४६) १५६४२ (०९-०४-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव येथे बायोमेट्रिकच्या नावाखाली अनुदानित वसतिगृह कर्मचाऱ्यांचे मानधन रोखून त्यांना त्रास देण्याचे काम शासकीय अधिकारी करित असल्याचे अनुदानित वसतिगृह संस्थाचालक संघटनेच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०७-२०१५)** :(१) नाही. तळेगाव येथील (१) समता विद्यार्थी वसतीगृह, तळेगाव ढमढेरे, ता. शिरुर व (२) महिलाश्रम मुलींचे वसतीगृह, तळेगाव ढमढेरे या दोन्ही वसतीगृहांचे माहे फेब्रुवारी, २०१५ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले आहे. बायोमेट्रीकच्या कामासाठी कोणत्याही अनुदानीत वसतीगृह कर्मचाऱ्यांचे मानधन रोखून धरण्यात आलेले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उद्योगांचे स्थलांतरण कर्नाटकात होत असल्याबाबत**

**(४७) २४४०२ (०६-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाच्या उदासिन भूमिकेमुळे उद्योगांचे स्थलांतरण कर्नाटकात होत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्नाटकामध्ये उद्योग येण्यास किती कंपन्या तयार आहेत हे विचारणा करताच १६०० अर्ज प्राप्त झालेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०८-२०१५)** : (१) महाराष्ट्र औद्योगिक धोरण - २०१३ व राज्यात नव्याने राबविण्यात येत असलेल्या "मेक इन महाराष्ट्र" या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यात उद्योग व व्यवसाय सुरु करण्यासाठी सुलभ व सुकर करण्यासाठी आवश्यक परवाने व ना-हरकती यांच्या संख्या कमी करणे व त्यासाठी लागणारा कालावधी कमी करण्यात येत आहे.

उपरोक्त सुधारणांच्या अंमलबजावणीमुळे एप्रिल, २०१५ पासून ८ विशाल प्रकल्प स्थापनेबाबत देकार पत्र देण्यात आले आहे. नुकतेच राज्य शासनाने मे.जनरल मोटर्स यांच्या समवेत रु.६,४०० कोटी वाहन उद्योगात गुंतवणूकीकरिता तर मे.फोक्सकॉम या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी समवेत येत्या १० वर्षात रु.३५,००० कोटी गुंतवणूक करुन ५०,००० रोजगाराच्या संधी देण्याबाबत सामंजस्य करार केला आहे. यास्तव राज्यात औद्योगिकरणासाठी पोषक वातावरण असून उद्योग स्थापन होत असल्याची वस्तुस्थिती आहे.
(२) कर्नाटक राज्यात उद्योग स्थलांतरीत होत असल्याबाबतची माहिती / अहवाल उद्योग विभागात उपलब्ध नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे धाड, धामणगांव (ता.जि. बुलडाणा) येथे रस्त्यावरील**
**बानगंगा नदीवरील पुलाचे बांधकामाबाबत**

**(४८) २७३२४ (०४-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धाड (ता.जि. बुलडाणा) येथे धाड धामणगांव रस्त्यावर बाणगंगा नदीवरील पुलामध्ये पावसाच्या पुराने वाहून आलेल्या कच-यामुळे पुलाचे पाणी अनेक शेतक-यांच्या शेतात जावून जिमनी खरडल्या गेल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे धाड, धामणगांव रस्त्यावरील बानगंगा नदीवरील पुलाचे बांधकाम होण्यासाठी गेल्या १५ वर्षापासून मागणी प्रलंबित असून सदर पूलाला दोन्ही बाजुला संरक्षण कठडे नसल्याने ब-याचदा वाहनांना अपघात होवून नदीच्या पात्रात कोसळलेल्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बुलडाणा जिल्हयातील मौजे धाड ता.जि.बुलडाणा येथे धाड ते धामणगांव रोडवरील बाणंगंगा नदीवर असलेल्या पुलाचे नव्याने बांधकाम होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग बुलडाणा यांचेकडे सदर प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात आला आहे. त्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१६) :**(१) व (२) हे अंशतः खरे आहे.

सद्यस्थितीत सदर रस्त्यावरील बाणगंगा नदीवर पुल नसून उंच डबल डेकर रपटा आहे व सदर रस्तावर संरक्षक कठडे नसून संरक्षक दगड आहेत.
(३) होय.

प्रश्नांकित कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. परंतु संकल्पचित्रानुसार कामाचा वाव बदलल्यामुळे रु. २०० लक्ष इतक्या किंमतीचा सुधारित प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता.तथापि, त्रुटीची पुर्तता करु सदर सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठीचा प्रस्ताव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाक प्रादेशिक विभाग, अमरावती यांच्या मार्फत सादर करण्याबाबत अधिक्षक, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला यांना सुचित केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील 'इंझवार' जातीची नोंद असलेल्या व्यक्तींना 'बिंझवार' जातीचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

**(४९) ३६१०७ (२२-१२-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्याच्या अनुसुचित जमातीच्या अध्यादेश १०८/७६ च्या यादीत 'बिंझवार' या जमातीचा अनुक्रमांक १० वर उल्लेख असून मध्यप्रदेशात या जमातीचा उल्लेख ११ व्या क्रमांकावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयात 'बिंझवार' जमातीची मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या असून विदर्भातील बोलीभाषेमुळे 'बिंझवार' नावाचा उल्लेख 'इंझवार' असा केला जात असल्यामुळे जाती प्रमाणपत्रापासून या जमातीला वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, 'इंझवार' जातीची नोंद असलेल्या व्यक्तींना 'बिंझवार' जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी शासनाने कार्यवाही केली आहे काय,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०३-२०१६) :**(१) होय.

(२) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ खालील दि.६.९.१९५० रोजीच्या राट्रपतीच्या पहिल्या आदेशात तसेच संसदेने वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार महाराष्ट्र राज्यसाठीच्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये अ.क्र.१० वर "Binjhwar" अशी अधिकृत नोंद आहे. सदर अनुसूचित जमातीच्या यादीमधील जमातीच्या नावांची जशी नोंद आहे तसे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही महसूल विभागांतर्गत जिल्हाधिकारी यांनी प्रधिकृत केलेले सक्षम प्राधिका-यांकडून केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास विभागाकडून पुस्तकाऐवजी झेरॉक्स पुरविल्या जात असल्याबाबत**

**(५०) ३६३६६ (२२-१२-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिदुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना प्रशासकीय सेवेत नोक-यांची संधी उपलब्ध व्हावी यासाठी सुरु केलेल्या स्पर्धा केंद्रात पुस्तकाऐवजी झेरॉक्स दिल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) मागील दोन वर्षापासून आदिवासी विकास विभागातील कर्मचारी व खाजगी संस्थेतील संचालकासोबत यांच्या संगमताने सदर प्रकार सुरु आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी आयुक्तांनी या प्रकाराची दखल घेतली आहे काय,

(४) तसेच झेरॉक्स अस्पष्ट असल्याने विद्यार्थ्यांना मानसिक त्रास होत असल्याने अनेक विद्यार्थी त्रस्त आहेत, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाचे सदर प्रकरणाची दखल घेतली आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०३-२०१६) :** (१) नाही. आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे मार्फत राज्यातील अतिदुर्गम भागातील अनुसूचित जमातीच्या पदवीधर उमेदवारांना १ महिना कालाधीचे स्पर्धा प्ररिक्षा कार्यक्रम राबविण्यात येतो. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी उमेदवारांना रु. ७००/- इतक्या किंमतीची छापील पुस्तके दिली जातात.
(२) नाही. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून राज्यात खाजगी संस्थेमार्फत कोणताही स्पर्धा परिक्षा कार्यक्रम राबविण्यात येत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) नाही. यासंदर्भात आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे यांसदर्भात तक्रार प्राप्त झालेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.